**जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पाणी व स्वच्छता.) जि.प. यवतमाळ यांच्या तर्फे जिल्हास्तर व पंचायत समीतीस्तरावर **स्वच्छ भारत मिशन व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या कार्यक्रमाचे सन 2015-16 लेखापरिक्षण करण्याकरीता सनदी लेखापालाची निवड करणेकरीता** ई-निविदा/निविदा/दपत्रके पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे सेवा पुरविण्याबाबत **अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

**1)** 1. प्रत्येक कामाचे निविदा प्रपत्र डाऊनलोड (Download) केल्याची निविदा फार्म फी रक्कम रु.1000/- (रु.एक हजार फक्त.) व इसारा रक्क्म रु 5000/- (रु.पाच हजार फक्त.) उपमुख्यकार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) धनाकर्ष व खाली दर्शविण्यात आलेले दस्तऐवज या कार्यालयास दिनांक 31/ 8/2016 ते दिनांक 6 / 9 / 16 पर्यंत (शासकीय सुटटीचे दिवस वगळुन) पाणी व स्वच्छता कार्यालय तिसरा माळा जि.प यवतमाळ आर्णी रोड यवतमाळ येथे बंद लिफाप्यात सादर करणे आवश्यक.

**लिफापा क्रं.1 :-**

व्हॅट प्रमाणपत्र, व्यवसायकर प्रमाणपत्र, , पॅन कार्ड, आयकर प्रमाणपत्र, माहालेखापालाकडे नोंदणी केल्याचे अदयावत प्रमाणपत्र , सनदी लेखापालाच्या संपुर्ण शैक्षणीक अहर्तचे प्रमाणपत्राची छायांकीत , पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे लेखापरिक्षण केले असल्यास संबधीत विभागाची आदेशाची व अनुभव प्रमाणपत्राची इत्यादी प्रमाणपत्र साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावे वरिल बाबीची पुर्तता केल्याचे आढळुन न आल्यास लिफापा क्रं.2 उघडल्या जाणार नाही.

अ) **लिफापा क्रं 2 :-**

यामध्ये निविदेत दर्शविलेल्या लेखापरिक्षणाचे दर स्पष्ट भरावे त्यात खाडाखोड असल्यास दर ग्राहय धरल्या जाणार नाही.

4 निविदा धारकांनी आपले पूर्ण नांव पूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक इत्यादी निविदा फार्मवर सुस्पष्ट लिहावेत.

5. निविदेसोबत जोडलेले सर्व कागदपत्रे सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेली असावी. तसे निविदेमध्ये आवश्यक ठिकाणी संबंधीत निविदाधारकांच्या स्वाक्षरी असाव्यात.

6. लिपाफा क्र.1 तांत्रिक निविदेचा प्रथम उघडण्यात येईल. त्यातील कागदपत्रे परिपूर्ण असेल तरच निविदा धारकांचा लिपाफा क्र.2 उघडण्यात येईल. याबाबत मा.मु.का.अ. जि.प. यवतमाळ यांचा निर्णय अंतिम राहील.

7. निविदा सादर करावयाचा शेवटचा दिनांक व ठराविक वेळेनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

8. ज्या सेवा पुरवठा धारकाचे दर स्विकारल्या जातील, त्यास सेवा पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासुन 3 दिवसांचे आत रुपये 100/- किंवा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार कार्यालय निश्चित करेल तेवढया किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे आवश्यक राहील. अन्यथा काम रद्य समजण्यात येऊन मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता.) जि.प. यवतमाळ यांचे अधिकारात लगतच्या कमी दर असलेल्या निविदा धारकास देण्यात येईल.

9. सदर आदेश जिल्हास्तर व सोळा पंचायत समित्यांच्या लेखापरिक्षाकरीता देण्यात येणार असल्याने आदेश मिळताच सनदी लेखापालाने त्याचे सुयोग्य नियोजन करावे व दिनांक 12/9 /2016. ला जिल्हास्तरावरील व 15/9/2016 पर्यंत सोळा पंचायत समित्यांचे लेखापरिक्षण पुर्ण करावे.

10. दरपत्रकामध्ये सर्व प्रकारचे कर व वाहतूक,खर्चासह वार्षीक दर देण्याता यावे त्यामध्ये सर्व करांचा समावेश असावा. त्याची वेगळी प्रतिपूर्ती केली जाणार नाही.

11. लेखापरिक्षण (जिल्हास्त्र,तालुका,ग्रामपंचायत स्तर ) पुर्ण झाल्याशिवाय त्याचे देयक मिळणार नाही हयाची संबधीत सनदी लेखापालाने नोंद घ्यावी.तसेच लेखापरिक्षण अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र तसेच लेखापरिक्षण देयक दोन प्रतीत देणे बंधनकारक राहील ते सुध्दा लाखात व रुपयामध्ये.

12. अटी व शर्ती निश्चित करण्याचे,व शिथिल करण्याचे, अधिकार मा.उप मु.का.अ.(पाणी व स्वच्छता) जि.प. यवतमाळ यांचे कडे राखून ठेवण्यात येत आहे.

13. वरिल आदेशामध्ये कमी अधिक करण्याचे अधिकार मा.उप मु.का.अ.(पाणी व स्वच्छता.) जि.प. यवतमाळ यांचे कडे राखून ठेवण्यात येत आहे.

14. सदर दर निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन पुढील एक वर्षा पर्यत बंधनकारक राहिल.

15. आपल्याकडून मिळणाऱ्या सर्व्हिसमध्ये या कार्यालयास अडथळे निर्माण झाल्यास आपली इसार रक्कम (सुरक्षा ठेविची) रक्कम जप्त करण्यात येईल.

16. निविदा धारकाने भरलेला कोणत्याही अनामत अगर सुरक्षा ठेवीवर या कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. सदर पुरवठयाचा वार्षीक करारनामा संपल्यानंतरच आपली (सुरक्षा ठेव ) अनामत रक्कम परत करण्यात येईल.

17. मंजुर करण्यात आलेले दर पुरवठाधारकास एक वर्षाकरिता बंधनकारक राहील तसेच रक्कम रु. 100/-चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल तथा ज्या प्रमाणे या कार्यालयास आपल्या पुरवठयाची आवश्यकता भासेल त्या प्रमाणे पुरवठा आदेश देण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

18. लेखापरिक्षण हे मुख्यालयी उपस्थित राहुन विहीत मुदतीत करण्याची जबाबदारी सनदी लेखापालाची राहील त्या प्रमाणे त्यांनी दर नमुद करणे प्रस्तावित आहे.

19. निविदा अंशत: अथवा संपुर्णत: मंजुर करण्याचा किंवा रद्य करण्याचा तसेच कोणतेही कारण न दाखविता पुरवठा सेवेमध्ये घट अथवा वाढ करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. यवतमाळ यांचे कडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

**वरील अटी व शर्ती मला मान्य आहेत.**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता.)**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**निविदा धारकांची सही**
**पत्ता व दुरध्वनी क्रंमाक**

## जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष
### जिल्हा परिषद, यवतमाळ
### लिफापा क्रमाक 1

निविदाधारकाकडील अनामत रक्कम रुपये धनाकर्ष स्वरुपात निविदेसोबत जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदा स्विकृत/विचारात घेतली जाणार नाही. निविदा अटी व शर्तीप्रमाणे निविदाधारकांनी अटी व शर्तीनुसार कार्यवाही न केल्यास त्यांची अनामत /सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

**सर्व सुविधेसह पुरवठा करण्याकरिता आवश्यक माहिती सदर प्रपत्र इतर दस्तऐवजासह स्कॅन करुन अपलोड करावे.**

1) सेवा पुरवठा धारकाचे नांव व संपर्क क्रमांक :-------------------------------------------

2) पत्ता:-------------------------------------------------------------------------------------

3) प्रमाणपत्र :

| अ.क्र | विवरणपत्र तपशील | प्रत जोडली होय/नाही |
|---|---|---|
| 1 | आयकर प्रमाणपत्र | |
| 2 | व्यवसाय कर प्रमाणपत्र | |
| 3 | विक्रीकर/सेवाकर प्रमाणपत्र | |
| 4 | माहालेखापालाकडे नोंदणी केल्याचे अदयावत प्रमाणपत्र | |
| 5 | लेखापालाच्या संपुर्ण शैक्षणीक अहर्तचे प्रमाणपक्षाची | |
| 6 | पॅन कार्ड | |
| 7 | पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे लेखापरिक्षण केले असल्यास संबधीत विभागाची आदेशाची व अनुभव प्रमाणपत्रा | |
| 8 | प्रतिज्ञा पत्र Affedevite / Nottery रु 100/- स्टेम्प् वर | |

4) वरील प्रमाणे सुचना व निविदा फॉर्मसोबत जोडलेल्या अटी व शर्ती हया मी वाचल्या असून त्या मला मान्य असुन बंधणकारक राहील.

**दिनांक:**

**निविदा धारकांची सही/शिक्का**
**पत्ता व दुरध्वनी क्रमांक**